# धर्म व राजकारण परस्पर संबंध

**प्रा . डॉ .अर्जुन येरगे** राज्यशास्त्र विभाग प्रमुख संशोधन मार्गदर्शक श्री संपतराव माने महाविद्यालय, खानापूर
जि .सांगली -४१५३०७ E-mail- arjunyerge@gmail.com

---

**गोषवारा –**

मानवी उत्पत्तीच्या आदिम काळापासून आजपर्यंत मानवाने आपल्या सर्वांगीण विकासासाठी अनेक संस्थांची निर्मिती केलेली आहे .मानवाच्या समाजजीवनाचे नियमन करण्यासाठी राज्यसंस्था उदयास आली .मानवी जीवनाच्या उन्नत्तीसाठी राज्यसंस्था जेवढी महत्वाची आहे ,तेवढीच महत्वाची धर्म संस्था आहे . मानवाचे सामाजिक ,राजकीय , आर्थिक कल्याण करण्याचे दायित्व राज्यसंस्थेचे असते तर मानवाचे नैतिक व अध्यात्मिक उन्नती करण्याचे कार्य धर्म संस्था करते.प्राचीन काळापासूनचा इतिहास जर पहिला तर धर्मसत्ता राज्यासत्तेस पूरक व मार्गदर्शक म्हणून कार्य करीत होती.मध्ययुगीन काळात मात्र धर्मसत्ते कडून राज्यसत्तेवर प्रभुत्व गाजवण्याचा प्रयत्न होऊ लागला.यातून धर्मसत्ता व राज्यासत्तेमध्ये अनेकदा संघर्ष झाले .आधुनिक काळात लोकशाही राज्याचा उदय होऊन जगातील बऱ्याच देशांनी धर्म ही व्यक्तीची वैयक्तिक बाब म्हणून मान्य करून धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाचा अवलंब केलेला आहे . स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारतीय संविधानामध्ये कलम २५ द्वारे धार्मिक स्वातंत्र बहाल करून नंतर धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाचा अंगीकार केला.परंतु अलीकडे धर्माचा वापर राजकारणासाठी मोठ्याप्रमाणात होऊ लागला आहे . धर्म आणि राजकारण सामाजिक जीवनाचे अनिवार्य घटक आहेत. ते एकमेकांना पूरक आहेत. धर्माच्या अभावी राजकारण विवेकशून्य होते. तर राजकारणाशिवाय धर्माचा विकास होत नाही. प्राचीन काळापासूनच धर्म आणि राजकारणात समन्वय होता. परंतु भारताच्या वर्तमान परिस्थितीत धर्म आणि राजकारणात अंतर ठेवणे योग्यच आहे.

Keywords – धर्म, राजकारण, धर्मनिरपेक्षता, भारतीय संविधान

**प्रस्तावना –**

धर्म श्रद्धा हे मानवी जीवनाचे एक वैशिष्ट्य आहे .आपल्यापैकी बहुतेक जण धर्मावर मनापासून विश्वास ठेवत असतात. चांगले -वाईट ,नैतिक -अनैतिक याविषयीची कसोटी म्हणून लोक धर्माकडे पाहतात. धर्माला जे मान्य आहे ते चांगले व नैतिक असे मानून निर्णय घेण्याकडे लोकांचा कल असतो. ईश्वरी शक्ती अस्तित्वात आहे असा विश्वास या धर्म श्रद्धेतूनच आपल्या दैनंदिन जीवनात पूजा ,प्रार्थना, नमाज, गुरु ग्रंथ साहेबांचे पठन यासारखे अनेक विधींचा प्रवेश होतो. धर्मश्रद्धा ईश्वरांच्या अस्तित्वावरील विश्वास, धार्मिक विधी व समारंभ यांचा संबंध प्रामुख्याने व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाशी आहे. म्हणूनच भारतीय संविधानाने आपल्याला धर्म स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार दिलेला आहे

आजवरच्या इतिहासात विविध धर्मपंथ असणाऱ्या समूहामध्ये अनेकदा संघर्ष झाला व त्यातूनच मानव जातीचे नुकसान झाले. या ऐतिहासिक अनुकरणातूनच धर्मनिरपेक्षतेचे तत्व विकसित झाले आहे. कोणत्याही सार्वजनिक हिताशी संबंधित विषयाचा निर्णय धर्मग्रंथातील तत्त्वज्ञान व विचार प्रमाणभूत मानून करू नये. समाज हिताला प्राधान्य देऊन सार्वजनिक प्रश्नावर निर्णय घ्यावा. याच अर्थाने आधुनिक काळातील राज्य हे धर्मनिरपेक्ष राज्य आहेत असे म्हटले जाते. स्वातंत्र्य व समता त्यांच्याप्रमाणेच धर्मनिरपेक्षतेचे तत्व हे लोकशाहीचे आधारभूत तत्व आहे.धर्म हा राजकारणास पथदर्शक असायला पाहिजे . धर्माचा हस्तक्षेप राजकारणात होऊ नये किंवा राजकारणासाठी धर्माचा वापर होऊ नये .असे धर्मनिरपेक्षतेच्या तत्वात अपेक्षित असते . परंतु अलीकडे धार्मिक स्थळे ,धार्मिक प्रतिक , धार्मिक समारंभाचा वापर राजकीय स्वार्थासाठी होत आहे . हे भारतीय लोकशाहीसाठी घातक आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये -**

१.धर्माचे म्हणजे काय व मानवी जीवनातील त्याचे महत्व अभ्यासणे .

२.भारतीय राज्यघटनेतील धर्म विषयक तरतुदीचा अभ्यास करणे .

३. धर्म व राजकारण यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे .

**शोध निबंधाची गृहीतके -**

१. धर्म ही श्रद्धा आणि प्रतीकावर आधारित अशी व्यवस्था आहे की जिचा उद्देश हा ज्ञानापेक्षा विश्वासाने नियंत्रित होतो.

२.कलम २५ते२८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे. तसेच ४२ व्या घटनादुरुस्तीने १९७६ मध्ये धर्मनिरपेक्ष या तत्वाचा समावेश सरनाम्यामध्ये करण्यात आला.

**३.**भारतीय राजकारणामध्ये धर्माचा वापर सत्ता मिळविण्यासाठी होत आहे .

**संशोधन पद्धती**

वरील शोध निबंधाच्या संशोधनासाठी ऐतिहासिक , विश्लेषणात्मक ,तुलनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे .

**धर्म आणि राजकारण संबंध-**

आपल्या शास्त्रात कर्तव्यालाच धर्म म्हटले आहे. धर्माचा अर्थ आहे धारण करणारा किंवा जे धारण केले जाते. धर्मच प्रत्येक वस्तूला तिच्या स्वरूपात धारण करतो आणि धारण केल्यानंतर त्याच्या स्वरूपाचे रक्षण होते . "धर्मी धारयते प्रजा" म्हणजे धर्म प्रजेचे

रक्षण करतो. जीवन जगण्याची रीत सांगणा-या श्रेष्ठ सिद्धांतांचा समूह म्हणजे धर्म. सत्याच्या सर्व कार्याला एक सुसंगत अर्थ स्पष्ट करण्याचा जिवंत प्रयोग म्हणजे धर्म होय .

'धर्माचे क्षेत्र व्यापक आहे.धर्म म्हणजे अध्यात्मिक शक्ती वरील विश्वास होय' असे एडवट टायलर म्हणतो. 'धर्म म्हणजे मनुष्यहून श्रेष्ठ असलेल्या शक्तीची उपासना की ज्या शक्तीच्या द्वारे मानवी जीवनाला मार्गदर्शन लाभते आणि मानवी जीवनाचे नियंत्रण होते' अशी धर्माची व्याख्या सर जेम्स फ्रेझरने केले आहे. ग्रीनच्या मते 'धर्म ही श्रद्धा आणि प्रतीकावर आधारित अशी व्यवस्था आहे की जिचा उद्देश हा ज्ञानापेक्षा विश्वासाने नियंत्रित होतो. तसेच अलौकिक शक्तीवर आधारित असलेला विश्वास की ज्यामध्ये आत्मवाद आणि मानवतावाद समाविष्ट झालेला असतो'.

धर्म आणि राजकारण यांचा संबंध प्राचीन काळापासून असलेले दिसून येते. धर्मामुळे व्यक्ती व्यक्तीमध्ये विभाजन किंवा व्यक्तीची वर्गवारी होते .विशिष्ट समाजात हा हिंदू तो मुसलमान तो शीख , ख्रिश्चन असे व्यक्तींमध्ये भेद निर्माण केले जातात. समाजात आणि राजकीय व्यवस्थेत एकाच धर्माचे लोक असतील तर धर्म आणि राजकारणाचा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता नसते किंवा राजकीय व्यवस्थेने एका विशेष धर्माला राजमान्यता दिली असेल तर धार्मिक संघर्ष निर्माण होत नाही. परंतु ज्या देशांमध्ये अनेक धर्माचे लोक कमी जास्त संख्येने असतात आणि ज्या देशात व्यक्तींना संघटन, विचार स्वातंत्र्य असे स्वातंत्र्याचे अधिकार संविधानानुसार दिलेले असतात अशा भारतासारख्या देशांमध्ये धर्म आणि राजकारणाचा संघर्ष उद्भवतो. किंबहुना राजकीय व सामाजिक नेते असा धार्मिक संघर्ष कडून आणतात आणि त्याद्वारे स्वतःचा स्वार्थ साधत असतात.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये वेगवेगळ्या जाती धर्माच्या लोकांनी मोलाची कामगिरी केली. परंतु त्यावेळेस धर्म आणि राजकारण ह्या आधारावर भारतीय लोकांमध्ये संघर्ष झाला नाही. कारण स्वातंत्र्य मिळवणे हेच लोकांचे एकमेव ध्येय होते. त्यासाठीच सर्वच धर्मातील लोक एकत्रित झाले आणि त्यांनी स्वातंत्र्याची चळवळ यशस्वीरित्या हाताळली होती. प्राचीन भारतात धर्माने राजकीय व्यवस्थेत महत्त्वाची कामगिरी बजावले होते. उदाहरणार्थ सम्राट अशोकाने बौद्ध धर्मालाच राजाश्रय दिला होता. त्यांच्या राज्य कारभारावर धर्माचा पगडा होता . भारतात जेंव्हा मोघलांचे साम्राज्य होते त्यावेळी मुस्लिम धर्माचा प्रभाव राजकरणावर जबरदस्त प्रमाणात होता. मोगलशाही ही मुस्लिम धर्माधिष्ठित होती. भारताप्रमाणेच युरोपमध्ये इसवी सन ९०० ते इसवी सन १४०० व्या कालखंडात धर्म आणि राजकारण यांच्यात अनेक संघर्ष झाले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर धर्माच्या आधारावर भारत आणि पाकिस्तान हे स्वतंत्र राष्ट्र निर्माण झाल्यावर स्वतंत्र भारतात धर्म आणि राजकारण संघर्ष वाढला .तत्पूर्वी इंग्रजांनी आपले हिंदुस्थानातील शासन मजबूत करण्यास धर्माचा आधार घेऊन हिंदुस्तानात फोडा आणि झोडा (डिव्हाइड अँड रुल) हे धोरण स्वीकारले होते. त्यांनी अस्तित्वात आणलेल्या अनेक योजना आणि कायद्याचा आधार धार्मिक होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदू मुस्लिम संघर्ष दूर करण्यासाठी आपल्या राज्यघटनेत धार्मिक स्वातंत्र्य व नंतर धर्मनिरपेक्षता या तत्वाला मान्यता दिली गेली .

**भारतीय संविधानातील धार्मिक स्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षता**

भारतीय राज्यघटनेच्या कलम २५ते२८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे. कलम २५ नुसार सार्वजनिक व्यवस्था, नीतिमत्ता व स्वास्थ्य इत्यादींना बाधक नसणाऱ्या बाबतीत सर्व व्यक्तींना आपल्या सद्सद विवेक बुद्धीनुसार आवडीच्या धर्माचा उच्चार, आचार व प्रचार करण्याचा हक्क आहे. कलम २६ नुसार धार्मिक गट अथवा संस्थांना धार्मिक कारणासाठी धार्मिक संस्था, विश्वस्त मंडळी स्थापन करण्याचा, अशा संस्थाचा कारभार पाहण्याचा व त्या संस्थेची स्थावर व जंगम मालमत्ता संपादन करण्याचा व ती बाळगण्याचा अधिकार आहे .तसेच त्या धार्मिक संस्थांचे प्रशासन चालवण्याचा अधिकार दिलेला आहे.राज्यघटनेतील कलम २७ नुसार ज्या करांचे उत्पन्न एखादा विशिष्ट धर्माच्या प्रसारासाठी व रक्षणासाठी होणार असेल असे कर सक्तीने वसूल केले जाऊ शकत नाहीत . तसेच कलम २८ नुसार संपूर्णतः राज्याच्या निधीतून चालविण्यात येणाऱ्या शिक्षण संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण देता येणार नाही.

भारतीय राज्यघटनेत ४२ व्या घटनादुरुस्तीने १९७६ मध्ये धर्मनिरपेक्ष या तत्वाचा समावेश सरनाम्यामध्ये करण्यात आला. याचा अर्थ असा होतो की भारतीय राज्यसंस्थेचा असा कोणताही धर्म नसेल, धर्म व राजकारण यांची सरमिसळ केली जाणार नाही. धर्म ही बाब केवळ खाजगी जीवनापूर्ती मर्यादित असेल. अर्थात राज्याद्वारे सर्व लोकांना सद्सद विवेकाचे तसेच स्वतःच्या निवडीनुसार धर्माचा प्रचार प्रसार व आचरण करण्याचे स्वातंत्र्य असेल.राज्यघटनेच्या स्वरूपाबद्दल जेव्हा घटना समितीमध्ये चर्चा झाली त्यावेळेस सेक्युलर हे विशेषण सरनाम्यात नमूद करण्यात यावी अशी काही सदस्यांची मागणी होती प्रा. के. टी. शहा यांनी धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी ही दोन्ही विशेषणे भारतीय संघराज्यस लावावीत अशी दुरुस्ती सुचवली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रा. शहा यांच्या दुरुस्तीला विरोध करताना असे सांगितले की प्रजासत्ताकाला अशी विशेषणे लावणे म्हणजे लोकशाही नष्ट करण्यासारखी आहे. एका विशिष्ट मतप्रणालीचे लोक भविष्य काळात सत्तेवर येतील असे नाही तेंव्हा त्यांचा अधिकार मर्यादित करणारी अशी विशेषणे कशाला? प्रा. शहा यांची दुरुस्ती घटना समितीत नामंजूर झाली.पुढे आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी ४२ व्या घटना दुरुस्तीने समाजवादी व धर्मनिरपेक्ष अशी विशेषणे घटनेच्या सरनाम्यात समाविष्ट केली. मात्र या ४२ व्या घटनादुरुस्तीत सेक्युलर शब्दाची व्याख्या करण्यात आली नव्हती. ४५ वी घटनादुरुस्ती विधेयकाद्वारे धर्मनिरपेक्षाने, समाजवादी या शब्दाची व्याख्या देण्याचा प्रयत्न केला. परंतु या विधेयकाला राज्यसभेचा पाठिंबा मिळाला नाही.

प्रस्तावित घटना दुरुस्तीने धर्मनिरपेक्ष या संज्ञाची व्याख्या 'सर्व धर्माविषयी समान आदर असणारी अशी केली होती'. परंतु सर्वधर्माविषयी समान आदर या व्याख्याने धर्मातीत राज्याची सर्व वैशिष्ट्ये प्रगट होत नाहीत. भारतीय समाजविज्ञान कोशा नुसार "जे राज्य घटनात्मक दृष्ट्या कोणत्याही धर्माशी बांधील नाही आणि त्यात हस्तक्षेपी करीत नाही. व्यक्तीला आणि समाजाला धार्मिक स्वातंत्र्याच्या हमी देते व व्यक्तीचा धर्म कोणताही असो तिच्याशी नागरिक म्हणून इतर सर्वांप्रमाणेच व्यवहार करते तेच धर्मनिरपेक्ष राज्य होय.

वरील प्रमाणे धर्मनिरपेक्षतेचा उद्देश चांगला असला तरी प्रत्यक्ष राजकीय व्यवहारात भारतीय नेत्यांनी त्या उद्देशाकडे पाठ फिरवली आणि आपल्या राजकीय स्वार्थासाठी धर्मनिरपेक्षतेकडे जाणून-बुजून दुर्लक्ष केले असे खेदाने म्हणावे लागेल.भारतात आजही शुल्लक कारणावरून धार्मिक दंगली होतात. असंख्य लोकांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. मनुष्य आणि वित्तहानी होत आहे. परंतु सरकारला चिंता आहे ते आपल्या खुर्चीची. अनेक धार्मिक संघर्षाचा निकाल न्यायालयात वर्षानुवर्षे लागत नाही सरकार कधी कधी त्यासाठी आयोगाची निर्मिती करते परंतु त्या आयोगाच्या शिफारशीचे पालन करणे सरकारवर बंधनकारक नाही. या सर्व परिस्थितीवरून आपणास असे सांगता येते की धर्म आणि राजकारण यांचा संबंध भारतीय राजकारणात आज आपले डोके वर करीत आहे. राजकारणी लोक आपले स्वार्थ साधित आहेत . त्याचे वाईट परिणाम जनतेला भोगावे लागणार आहेत .याची मुख्य कारणे म्हणजे राष्ट्राभिमान वृत्तीचा लोप,राजकरण्याद्वारे राष्ट्र हितापेक्षा स्वहित व पक्ष हिताला महत्व ,सत्तेची लालसा , राजकीय नैतिकतेचा अभाव,लोकांची राजकीय व्यक्तीप्रती असणारी अंधभक्ती, बेजबाबदारपणा, धर्माचा भारतीय समाज मनावर असणारा प्रभाव, शिक्षणाचा अभाव, गरिबी ,दारिद्र्य ,धर्मिक कट्टरता , राजकीय सामाजीकरणाचा अभाव अशा कारणामुळे भारतात धर्माचा वापर सत्ता मिळविण्यासाठी होताना दिसतो .

**सारांश -**

थोडक्यात आज धर्म आणि राजकारणाचा संबंध पाहिला तर आजच्या इतके राजकारण धर्माच्य नावाने पूर्वी कधी चालले असेल असे वाटत नाही. पण असे असूनही खरी धार्मिक वृत्ती नावालाही दिसत नाही. आज राजकारणात सगळीकडे चारित्र्यहीनताच दिसते आहे. धर्माच्या नावावर राजकारणात स्थान टिकवू पाहणारे धर्मात्मा धर्माचे किती आचरण करतात हे खरोखरच पाहण्यासारखे आहे .राजकारण धर्ममय करायचे म्हणजे स्वार्थ सोडून राजकारण करायचे. धर्म म्हणजे स्वार्थ सोडणे. पण आज स्वार्थासाठी धर्माचा उपयोग केला जात आहे हे खरोखरच देशाचे दुर्दैव आहे.भारतामध्ये आज अनेक असे राजकीय पक्ष व संघटना आहेत जे धर्माचा आधार घेऊन चालतात. या पक्ष,संघटना आपल्या स्वार्थासाठी धर्मा धर्मात भांडणे लावत असतात. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्य धोक्यात येते.

राजकारणात दोष असण्याची शक्यता असते. त्यास दोषमुक्त करण्यासाठी एका विशिष्ट दर्जाची गरज असते. तो दर्जा म्हणजे धर्म होय . धर्मरूपी आरशात राजकारण आपल्या सत्कर्माचा व दुष्कर्माचा चेहरा पाहू शकते. म. गांधी यांच्या मते , "धर्मापासून वेगळ्या राजकारणाची आपण कल्पनाही करू शकत नाही" डॉ. राममनोहर लोहियायांच्या मते , 'अल्पकालीन धर्म म्हणजे राजकारण," दीर्घकालीन राजकारण म्हणजे धर्म" स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा गांधीजींनी गीतेपासून घेतली तर लो. टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक रूप देऊन समाज जागृती केली. राष्ट्रध्वजावर अंकित असलेले अशोकचक्र धर्मपरायण राजकारणाचे उदाहरण आहे.म्हणून गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे राजकारण नैतिक व अध्यात्मिक करणे आवश्यक आहे म्हणजेच समाजाची निस्वार्थ सेवा करणे अपेक्षित आहे. त्यासाठी स्वतःला समाजासाठी अर्पण करणे काळाची गरज आहे .तरच भारत अखंड सार्वभौम देश बनू शकेल.

**संदर्भ ग्रंथ –**

1. भोळे भा.ल – भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण ,पिंपळापुरे अंड कं.पब्लिशर्स नागपूर
2. डॉ.फाडीया बी.एल ., डॉ . जैन पुखराज –भारतीय शासन आणि राजनीती – साहित्य भवन पब्लीकेशन आग्रा
3. सेंगर शैलेंद्र , भारतीय लोकतंत्र के समक्ष चुनौतीया , २००९ गुंजन प्रकाशन दिल्ली
4. डॉ . येरणकर श्रीराम , डॉ. कायंदे संतोष – राजकारणातील अधुनिक संकल्पना आणि विचार ,२०१९ प्रशांत पब्लीकेशन जळगाव
5. सिंह जगपाल ,बटब्याल राकेश, – धर्म और राजनीती खंड ४ -२०२० प्रकाशन इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय, नई दिल्ली